वृत्तपत्राचे नाव : दैनिक हितवाद
प्रकाशन स्थळ : नागपूर
दिनांक : 22 APR 2025

# CM presents Rajiv Gandhi Administrative awards

- Vidarbha's Vijayalaxmi Bidari, Dr Vipin Itankar, Dr Abhijeet Chaudhari, Rahul Kardile, Yogesh Kumbhejkar, Avinash Mahamuni figure in list

**■ Staff Reporter**

CHIEF Minister Devendra Fadnavis on Monday presented Rajiv Gandhi Prashaskiya Gatimanta Puraskar to selected administrative officers. Those from Vidarbha who figured in the list include Divisional Commissioner Vijayalaxmi Bidari, District Collector Dr Vipin Itankar, Municipal Commissioner Dr Abhijeet Chaudhari, the then Collector of Wardha Rahul Kardile, the then Collector of Bhandara Yogesh Kumbhejkar, Nagpur Zilla Parishad Chief Executive Officer Avinash Mahamuni.

Skill, Employment, Entrepreneurship and Innovation Minister Mangalprabhat Lodha, Chief Secretary Sujata Saunik were also present on the dais.



Vijayalaxmi Bidari receiving award at the hands of Devendra Fadnavis. Mangal Prabhat Lodha, Sujata Sounik look on.



Dr Vipin Itankar receiving the award.



Dr Abhijeet Chaudhari receiving the award.

Divisional Commissioner Vijayalaxmi Bidari was honoured for innovative initiative 'e-Panchnama App'. The award consists of a cash prize of Rs 10 lakh. The award was presented to the Divisional Commissioner's Office for implementing an innovative initiative to provide direct assistance through DBT by creating an 'e-Panchnama App' to help citizens in situations arising during 12 different types of natural disasters. Devendra Fadnavis presented the third prize to District Collector Dr Vipin Itankar for his initiative 'Dawakhana Aaplya Dari' in the State-level 'Best Idea/Initiative-Government Officer' category in the Rajiv Gandhi Administrative Acceleration (PRAGATI) Mission Competition.

CM presented Rajiv Gandhi Prashaskiya Gatimanta Puraskar to NMC for its excellent work in developing Financial Accounting System. Municipal Commissioner and Administrator Dr Abhijeet Chaudhari accepted the award during Civil Service Day. The award function was held in Mumbai on Monday. The FAS was developed by Information Technology Department of NMC in 2023-24. NMC forwarded its entry of FAS for Rajiv Gandhi Prashaskiya Gatimanta Puraskar through divisional committee. After scrutiny of entries received from all over the State, NMC's FAS was chosen. Prior to this, NMC's Geo-Civic application developed for Property Tax was awarded at State level.

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर
dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in | @InfoVidarbha | dirinfNagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक नवराष्ट्र

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 22 APR 2025


# 'ई-पंचनामा ॲप'करिता विभागीय आयुक्तांचा सन्मान



नागपूर, सिटी रिपोर्टर. नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीची माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाने राबविलेल्या 'ई-पंचनामा ॲप' या अभिनव उपक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबई येथे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांना वर्ष 2023-24 चा राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्काराने गौरविण्यात आले.

सह्याद्री राज्य अतिथीगृहात वर्ष 2023-24 आणि वर्ष 2024-25 चे राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कार प्रदान करण्यात आले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता, व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा आणि मुख्य सचिव सुजाता सौनिक यावेळी उपस्थित होत्या. 10 लाख रूपये रोख, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अवलोकनार्थ/खुलासा करण्यासाठी

प्रति,

..............................................................

..............................................................

..............................................................

शामुना-वाय-२०१-जिमानाअ-६-२०२३-१५,००० प्रती-पीए४.

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर
dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in | @InfoVidarbha | dirinf Nagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 22 APR 2025

मस्ट READ

## विभागीय आयुक्त बिदरी, जिल्हाधिकारी इटनकर, मनपा आयुक्त चौधरी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रसाद लोढा व मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागरी सेवा दिनानिमित्त सोमवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यात नागपूरच्या तीन वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांचा समावेश होता. नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कारावर नागपूरची मोहोर**

सह्याद्री राज्य अतिथीगृह सभागृहात पार पडलेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्यात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रसाद लोढा व राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक प्रामुख्याने उपस्थित होते.

'ई-पंचनामा ॲप' या अभिनव उपक्रमासाठी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांना वर्ष २०२३-२४ च्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्काराने गौरविण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धेतील राज्यस्तरीय 'सर्वोत्कृष्ट कल्पना, उपक्रम-शासकीय अधिकारी' या प्रकारात दवाखाना आपल्या दारी उपक्रमासाठी तृतीय पारितोषिक देऊन गौरविले. तर नागपूर महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना फायनान्सियल अकाउंटिंग सिस्टम (एफएएस)या प्रणालीसाठी २०२३-२४ या वर्षासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# राज्यात बिदरी, चौधरी, इटनकर यांचा डंका

◆ नागपूर, २१ एप्रिल

**नैसर्गिक आपत्तीत नुकसानीची माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाने राबविलेल्या ई पंचनामा ॲपला, महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने विकसित केलेल्या आर्थिक नियोजन प्रणाली अर्थात फायनान्शियल अकाऊंटिंग सिस्टीम (एफएएस)या प्रणालीला तर जिल्हाधिकारी कार्यालयाने राबविलेल्या दवाखाना आपल्या दारी उपक्रमाला पुरस्कार मिळालेला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबई येथे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी तर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर या तिन्ही सनदी अधिकाऱ्यांना राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्काराने गौरविण्यात आले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता, व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा आणि मुख्य सचिव सुजाता सौनिक यावेळी उपस्थित होत्या.**

## तिन्ही अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव




मुख्यमंत्र्यांकडून पुरस्कार स्वीकारताना विजयलक्ष्मी बिदरी, डॉ. अभिजित चौधरी, डॉ. विपीन इटनकर. डावीकडे सुजाता सौनिक, मंगलप्रभात लोढा

### बिदरी यांचा ई-पंचनामा ॲप अभिनव

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांना २०२३-२४ आणि वर्ष २०२४-२५ चे राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कार प्रदान करण्यात आले. १० लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विविध प्रकारच्या १२ नैसर्गिक आपत्तींच्या वेळी उद्भवणाऱ्या परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी 'ई-पंचनामा ॲप' तयार करण्यात येऊन डीबीटीद्वारे थेट मदत देण्याचा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल विभागीय आयुक्त कार्यालयास हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अतिवृष्टी, अवकाळी, दुष्काळ आदी नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या शेती पिकांच्या नुकसानीची मदत वेळेत शेतकऱ्यांना मिळावी यासाठी विभागीय आयुक्त बिदरी यांच्या संकल्पनेतून 'ई पंचनामा ॲप' हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला. डिसेंबर २०२२ मध्ये ॲप तयार करण्यास सुरुवात झाली आणि एप्रिल २०२३ मध्ये ॲप तयार झाले. यापूर्वी पंचनामे करायला दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी लागायचा. या ॲपमुळे पंचनामे सात

### मनपाच्या एफएएस प्रणालीची दखल

महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने विकसित केलेल्या आर्थिक नियोजन प्रणाली अर्थात फायनान्शियल अकाऊंटिंग सिस्टीम (एफएएस)या प्रणालीसाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी हा १० लाख रुपयांचा पुरस्कार मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना प्रदान करण्यात आला आहे.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धा २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तरावर थेट प्राप्त प्रस्ताव आणि विभागीय समित्यांकडून प्राप्त प्रस्तावांमधून राज्यस्तरीय निवड समितीने नागपूर महापालिकेने राबविलेल्या या प्रणालीची या पुरस्कारासाठी निवड केली. या पुरस्कारांची घोषणा राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने काही दिवसांपूर्वी केली होती. या पुरस्कारने नागपूर महापालिकेने राबवलेल्या या अभिनव प्रणालीचा राज्यपातळीवर गौरव झाला आहे.

यापूर्वी सुद्धा नागपूर महापालिकेला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. जिओ-सिव्हिक मालमत्ता कर व्यवस्थापन प्रणालीसाठी गेल्यावर्षी नागपूर महापालिकेला सन्मानित करण्यात आले

### प्रगती अभियान, स्पर्धेत तृतीय

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान स्पर्धेतील राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट कल्पना,उपक्रम-शासकीय अधिकारी या प्रकारात दवाखाना आपल्या दारी उपक्रमासाठी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांना तृतीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. प्रशासन लोकाभिमुख करणे, त्यात निर्णयक्षमता आणणे आणि सर्वांच्या सहकार्यातून उत्तम प्रशासन कार्यान्वित करण्यासाठी वर्ष २०२४-२५ या वर्षात राज्यस्तरावर तसेच तालुका, जिल्हा, विभागीय स्तरावर व महानगरपालिका स्तरावर 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान' राबविण्यात आले. या सर्व पुरस्कार विजेत्या संस्था व अधिकाऱ्यांना पुरस्कार रकमेचा उपयोग कार्यालयांच्या सुधारणेसाठी तसेच स्पर्धेत पाठविण्यात आलेल्या उपक्रमांच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी करण्यात येणार आहे.

(तभा वृत्तसेवा)

# वृत्तपत्र कात्रणे


महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
नागपूर-अमरावती विभाग,
जुने सचिवालय, नागपूर
dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com
दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२
dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinf Nagpur


वृत्तपत्राचे नाव : दैनिक नवभारत

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 22 APR 2025



## 'ई-पंचनामा एप' के लिए विभागीय आयुक्त सम्मानित

**सीएम के हाथों गतिमानता पुरस्कार प्रदान**

■ नागपुर, निज संवाददाता. नैसर्गिक आपदा में हुए नुकसान की जानकारी लेने के लिए विभागीय आयुक्त कार्यालय द्वारा उपयोग किए गए 'ई-पंचनामा एप' अभिनव उपक्रम के लिए मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस के हाथों मुंबई में आयोजित समारोह में विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी को वर्ष 2023-24 का राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कार से सम्मानित किया गया. मंत्री मंगल प्रभात लोढ़ा व मुख्य सचिव सुजाता सौनिक की उपस्थिति में 10 लाख रुपये का पुरस्कार दिया गया. इस एप के माध्यम से विविध प्रकार के 12 नैसर्गिक आपदा के समय के हालातों में नागरिकों को मदद दी जाती है. डीबीटी के माध्यम से उन्हें सीधे मदद में इस उपक्रम से मदद मिलती है.

अवलोकनार्थ/खुलासा करण्यासाठी

प्रति,

..............................

..............................

..............................

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

नागपूर-अमरावती विभाग,

जुने सचिवालय, नागपूर

dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com

दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinf Nagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकसत्ता

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 22 APR 2025


# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार प्रदान

## बिदरी, चौधरी, इटनकर मानकरी



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर** : शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता व सुशासन शाखेतर्फे दरवर्षी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान राबवले जाते. २०२४-२५ या वर्षासाठी नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर व महापालिका आयुक्त अभिजित चौधरी यांनी राबवलेल्या उपक्रमाला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार जाहीर झाले होते. सोमवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

'ई-पंचनामा ॲप' साठी विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे डॉ. विपीन इटनकर यांना उत्कृष्ट संकल्पना व उपक्रम या गटात पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तो डॉ. इटनकर यांना मुंबई येथील कार्यक्रमादरम्यान प्रदान करण्यात आला.

इटनकर यांनी जिल्ह्यात राबवलेल्या 'दवाखाना आपल्या दारी' या उपक्रमाची निवड झाली होती. महापालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने विकसित केलेल्या आर्थिक नियोजन प्रणालीसाठी नागपूर महापालिकेला हा पुरस्कार जाहीर झाला होता. आयुक्त अभिजत चौधरी यांनी तो मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्वीकारला.

करण्यासाठी

प्रति,

..............

..............

..............................................................

dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinfNagpur

वृत्तपत्राचे नाव : दैनिक पुण्यनगरी

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 22 APR 2025

# 'ई-पंचनामा ॲप' या अभिनव उपक्रमासाठी विभागीय आयुक्तांचा सन्मान



## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार' प्रदान

**नागपूर :** नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीची माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाने राबविलेल्या 'ई-पंचनामा ॲप' या अभिनव उपक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी मुंबई येथे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांना वर्ष २०२३-२४ च्या 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कारा'ने गौरविण्यात आले.

सह्याद्री राज्य अतिथिगृहात वर्ष २०२३-२४ आणि वर्ष २०२४-२५ चे 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कार' प्रदान करण्यात आले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा आणि मुख्य सचिव सुजाता सौनिक यावेळी उपस्थित होत्या. १० लाख रुपये रोख, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. विविध प्रकारच्या १२ नैसर्गिक आपत्तीच्या वेळी उद्भवणाऱ्या परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी 'ई-पंचनामा ॲप' तयार करण्यात येऊन डीबीटीद्वारे थेट मदत देण्याचा अभिनव उपक्रम राबविल्याबद्दल विभागीय आयुक्त कार्यालयास हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अतिवृष्टी, अवकाळी, दुष्काळ आदी नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीची मदत वेळेत शेतकऱ्यांना मिळावी यासाठी विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांच्या संकल्पनेतून 'ई-पंचनामा ॲप' हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला. डिसेंबर २०२२ मध्ये 'ॲप' तयार करण्यास सुरुवात झाली आणि एप्रिल २०२३ मध्ये 'ॲप' तयार झाले. यापूर्वी पंचनामे करायला दोन ते अडीच महिन्यांचा कालावधी लागायचा. या ॲपमुळे पंचनामे सात दिवसांत व्हायला लागले. मे आणि जून २०२३ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, तहसीलदार, तलाठी यांना याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. यानंतर नागपूर विभागात या ॲपद्वारे पंचनामे करण्यात आले. ॲपद्वारे पंचनाम्याचा देशातील पहिलाच प्रयोग नागपूर विभागात यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात 'ई पंचनामा ॲप'चा उपयोग करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अवलोकनार्थ/खुलासा करण्यासाठी

प्रति,

.......................

.......................

.......................

वृत्तपत्राचे नाव : दैनिक लोकमत समाचार

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 2 APR 2025

### विभागीय आयुक्त बिदरी, जिलाधिकारी इटनकर, मनपा आयुक्त चौधरी सम्मानित

# राजीव गांधी गतिमानता पुरस्कार में नागपुर छाया

**नागपुर :** नागरी सेवा दिवस पर सोमवार को मुंबई में मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस के हाथों राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार वितरित किए गए. नागपुर शहर के तीन वरिष्ठ आईएएस अधिकारी इस दौरान सम्मानित हुए. विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिलाधिकारी डॉ. विपिन इटनकर और मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी को मुख्यमंत्री के हाथों पुरस्कृत किया गया.

सह्याद्री राज्य अथितिगृह सभागृह में आयोजित इस पुरस्कार वितरण समारोह में कौशल, रोजगार, उद्यमिता मंत्री मंगलप्रसाद लोढ़ा एवं प्रदेश की मुख्य सचिव सुजाता सौनिक प्रमुखता से मौजूद थे. प्राकृतिक आपदा से हुई क्षति की जानकारी लेने के लिए विभागीय आयुक्त कार्यालय द्वारा क्रियान्वित ई-पंचनामा एप्प के लिए विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी को वर्ष 2023-24 का राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान पुरस्कार दिया गया. जिलाधिकारी डॉ. विपिन इटनकर को राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगति) अभियान स्पर्धा के लिए सर्वश्रेष्ठ कल्पना, उपक्रम-शासकीय अधिकारी श्रेणी में दवाखाना आपने द्वार उपक्रम के लिए सम्मानित किया गया. इसी प्रकार मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी को मनपा के सूचना तकनीक विभाग द्वारा विकसित फाइनेंशियल अकाउंटिंग सिस्टम (एफएएस) के लिए पुरस्कृत किया गया. नागपुर जिला परिषद को भी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार प्रदान किया गया.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस के हाथों राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्कार स्वीकारते हुए विजयलक्ष्मी बिदरी, डॉ. विपिन इटनकर और डॉ. अभिजीत चौधरी. साथ में मंत्री मंगलप्रसाद लोढ़ा.

प्रति,

....................................................

....................................................

....................................................

# वृत्तपत्र कात्रणे

महाराष्ट्र शासन

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

नागपूर-अमरावती विभाग,

जुने सचिवालय, नागपूर



dirinfngp@gmail.com /dirnfingp2015@gmail.com

दूरध्वनी : ०७१२-२५६५१०८, २५६०६५२

dirinfngp.blogspot.in @InfoVidarbha dirinfNagpur


वृत्तपत्राचे नाव : दैनिक पुण्यनगरी

प्रकाशन स्थळ : नागपूर

दिनांक : 12 APR 2025

# प्रथम 'सेवा हक्कदिन' प्रभावीपणे राबवावा : विभागीय आयुक्त

## नागपूर विभागातील सहाही जिल्हा प्रशासनाला सूचना



**नागपूर :** नागपूर विभागातील सहाही जिल्ह्यांत ग्रामीण व जिल्हास्तरावर २८ एप्रिल रोजी सेवा हक्क कायद्याची दशकपूर्ती व पहिला 'सेवा हक्कदिन' आयोजित करण्यात येणार आहे. शासनाने निर्धारित केलेले विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि राज्य लोकसेवा हक्क आयोग नागपूर विभागाचे आयुक्त अभय यावलकर यांनी १७ एप्रिलला संबंधित जिल्हा प्रशासनाला दिल्या. विभागीय आयुक्त कार्यालयात 'सेवा हक्कदिन' आयोजनासंदर्भातील पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, विभागीय आयुक्तालयातील सामान्य प्रशासन अपर आयुक्त तेजूसिंह पवार, विकास उपायुक्त कमलकिशोर फटाणेंसह दूरदृश्य प्रणालीद्वारे वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि व्यक्तींना पात्र लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागात पादर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी राज्यात लोकसेवा हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

राज्य शासनाने या वर्षीपासूनच २८ एप्रिल हा 'सेवा हक्कदिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या कायद्याच्या दशकपूर्तीनिमित्ताने नागपूर विभागातील ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, जिल्हा प्रशासन, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रांमध्ये राबवायच्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी देण्यात आली.

अवलोकनार्थ/खुलासा करण्यासाठी

प्रति,

............

............

............